# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.11.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर कॅनडाच्या मंत्र्यानी केलेल्या आरोपांचा भारताकडून तीव्र निषेध; या बेजबाबदार कृतीचा द्विपक्षीय संबंधांवर गंभीर परिणाम होण्याचा इशारा
2. भारत स्वत:कडे एक जागतिक मित्र म्हणून पाहतो आहे: परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर
3. काश्मीर खोऱ्यात झालेल्या 2 चकमकीत 3 दहशतवादी - सुरक्षा दलांकडून ठार
4. मध्य प्रदेशातील बांधवगड व्याघ्र प्रकल्पात दहा हत्तींच्या मृत्यूची चौकशी सुरू आणि
5. मुंबईतल्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या डावात - न्यूझीलंडला 9 बाद 171 धावांवर रोखून भारताची आघाडी.

**भारत-कॅनडा**

कॅनडाच्या सार्वजनिक सुरक्षितता आणि राष्ट्रीय सुरक्षितता स्थायी समितीसमोर, कॅनडाचे उपमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबाबत केलेल्या आरोपांचा भारतानं तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अशा बेजबाबदार कृतीचा द्विपक्षीय संबंधांवर गंभीर परिणाम होईल असा इशारा देत परराष्ट्र मंत्रालयानं शुक्रवारी कॅनडाच्या उच्चायुक्तालय प्रतिनिधीला बोलावून तीव्र नाराजी व्यक्त केली. 29 ऑक्टोबरला ओटावा इथल्या स्थायी समितीच्या संबंधित कामकाजाबाबत एक राजनैतिक टिपण सुपूर्द करण्यात आल्याची माहिती मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना दिली.

कॅनडामध्ये दिवाळी निमित्त आयोजित कार्यक्रम रद्द केलं जाणं दुर्दैवी असून, कॅनडातील सध्याचं वातावरण असहिष्णुता आणि अतिरेकीपणाच्या उच्च पातळीवर पोहोचल्याचं जैस्वाल यांनी म्हटलं आहे. आपण सध्या कॅनडामध्ये असलेल्या भारतातील विद्यार्थी आणि तात्पुरत्या कामगारांच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवून असल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान सीमा विस्कळीत करण्याच्या मुद्द्यावर, डेमचोक आणि डेपसांग प्रदेशांमध्ये भारत आणि चीन यांच्यात परस्पर मान्य अटींनुसार पडताळणी गस्त सुरू झाली आहे असं ते म्हणाले. भारत आणि चीन यांच्यात 21 ऑक्टोबर रोजी तोडगा काढण्याच्या अंतिम टप्प्यावर सहमती झाली होती.

**जयशंकर**

भारत आज स्वत:कडे  एक जागतिक मित्र म्हणून पाहत असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे काल एका पुस्तक प्रकाशन समारंभात ते बोलत होते. भारत  शक्य तितक्या देशांशी मैत्री करू इच्छित असल्याचं डॉ. जयशंकर म्हणाले. भारतामध्ये सांस्कृतिक आणि ऐतिहासिक घटक कार्यरत असून आपला देश एक कट्टर सभ्यता नाही-  ही वस्तुस्थिती असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. QUAD बाबत बोलतांना अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया देशाला QUAD चा फायदा झाला असल्याचं जयशंकर यांनी सांगितलं. सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता यासारखे संवेदनशील मुद्दे आपल्या सहकाऱ्यांचं मूल्यमापन  करण्यासाठीचे  कायमचे घटक असल्याचं ते म्हणाले. काही मित्र इतरांपेक्षा अधिक क्लिष्ट असू शकतात आणि परस्पर आदराची संस्कृती किंवा मुत्सद्दी शिष्टाचाराची समानता कायमच  सारखी असेल, असं नाही असं त्यांनी सांगितलं.

**दहशतावादी काश्मिर**

काश्मिर खोऱ्यात काल सुरक्षा दल आणि दहशतवादी यांच्या दरम्यान  झालेल्या दोन वेगवेगळ्या चकमकीत तीन दहशतवाद्यांना सुरक्षा दलांनी  ठार केलं . श्रीनगर खानयार भागात झालेल्या चकमकीत उस्मान उर्फ छोटा वालीद, हा पाकिस्तानचा लष्कर कमांडर ठार झाल्याच्या वृत्ताला काश्मिरचे पोलिस प्रमुख व्ही के बिर्डी यांनी दुजोरा दिला आहे. काश्मिर खोऱ्यातल्या अनेक दहशतवादी गुन्ह्यांमध्ये उस्मानचा सहभाग असल्याचंही बिर्डी यांनी सांगितलं. या चकमकीत सुरक्षा दलाचे 4  कर्मचारी जखमी झाले.दुसऱ्या एका चकमकीत अनंतनाग जिल्ह्यात लार्नू कुकेरनाग इथे  दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात सुरक्षा दलाला यश आलं. दरम्यान, उत्तर काश्मीरमधील बांदीपोरा इथे, पनार परिसरात  दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर अंदाधुंद गोळीबार करून घनदाट जंगलात पळ काढला. या परिसरात सुरक्षा दलाची शोध मोहीम सुरू आहे.

**दूरदर्शन**

दूरदर्शनच्या वृत्तवाहिनीला आज 20  वर्षे पूर्ण होत आहेत. या दिवशी पूर्वीची डीडी-मेट्रो ही वाहिनी अहोरात्र वृत्त वाहिनीमध्ये रुपांतरित करण्यात आली होती. दूरदर्शनच्या ३१ प्रादेशिक वृत्त वाहिन्या असून समाज माध्यमांवरही डीडी न्यूज अतिशय प्रभावीपणे सक्रिय आहे.

**हत्ती**

मध्य प्रदेशातील बांधवगड व्याघ्र प्रकल्पात झालेल्या हत्तींच्या मृत्यूची चौकशी सरकारनं सुरू केली आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या - वन्यजीव गुन्हे नियंत्रण कक्षाने, व्याघ्र प्रकल्पातल्या राखीव भागात झालेल्या दहा हत्तींच्या मृत्यूच्या चौकशीकरता एक पथक तयार केलं आहे. हे पथक या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करत असून मध्य प्रदेश सरकारनेही या प्रकरणाच्या चौकशीसाठी पाच जणांची राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे.

**स्पेन-पूर**

स्पेनमधील वॅलेन्शिया प्रदेशातील पूरस्थिती हाताळण्यासाठी स्थानिकांच्या रोषानंतर पंतप्रधान पेद्रो सांचेझ यांनी आणखी पाच हजार सैनिक आणि पाच हजार पोलिस अधिकारी तसंच नागरी रक्षकांना तैनात केलं आहे. दरम्यान सतराशे सैनिक याआधीच शोध आणि बचाव कार्य करत आहेत. भूमध्य समुद्रावरील हवामानाच्या परिस्थितीमुळे स्पेनमध्ये काही तासांत झालेल्या अभूतपूर्व पावसानंतर आलेल्या पुरामध्ये आतापर्यंत 211 लोकांचा बळी गेला असून ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. या पुरामध्ये शहरांमधील पुल वाहून गेले असून सर्वच रस्त्यांवर चिखल झाला आहे; तसंच वाहून आलेल्या गाड्यांचे ढीग लागले आहेत. लोकांना पिण्याचं पाणी उपलब्ध होत नसून घरं मातीत गाडली गेल्यामुळे लोक आपल्या घरांमध्येही जाऊ शकत नसल्याची स्थिती आहे. हताश लोक अजूनही त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. हा पूर युरोपमधला शतकातला सर्वात भीषण पूर असल्याचं वर्णन केलं जात आहे.

**अमेरिका-निवडणूक**

अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष निवडण्यासाठी आता तीन दिवस शिल्लक असून तिथे निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला आहे. रिपब्लीकन पक्षाचे उमेदवार डोनल्ड ट्रंप आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरीस यांनी उत्तर कॅरोलिना आणि वर्जिनिया या निवडणुकीत महत्वाच्या असलेल्या राज्यांमध्ये काल ठिकठिकाणी प्रचारसभा घेतल्या. रिपब्लिकन्स पक्षाकरता हमखास विजयासाठी उत्तर कॅरोलिना राज्य महत्वाचं असून डेमोक्रॅट समर्थक इथली बाजी पलटवण्यासाठी नेटानं प्रयत्न करत आहेत.

**राजनाथ-संरक्षण**

भारताच्या आत्मनिर्भर मोहिमेचे अपेक्षित परिणाम होत असून देशाची संरक्षण निर्यात 2029-30 पर्यंत 50 हजार कोटी रुपयांपर्यंत जाईल असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. कानपूर इथल्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या 65 व्या स्थापना दिवस समारंभात ते काल बोलत होते. भारतीय तरुणांना 'विकसित भारत' हा दृष्टिकोन साकार करण्यासाठी देशात आयात होणाऱ्या उच्च तंत्रज्ञानाचा

स्वदेशात विकास करण्याचं संरक्षणमंत्र्यांनी आवाहन केलं. आयआयटी कानपूरसारख्या संस्था शैक्षणिक इंजिनं असून सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात ती भारताला गतिशीलता प्रदान करू शकतात असं राजनाथ सिंह म्हणाले. स्वावलंबित्व मिळविण्यासाठी सरकारचे प्रयत्न अत्यंत यशस्वी ठरत असून 10 वर्षांपूर्वी केवळ 600 कोटी रुपयांची असलेली संरक्षण निर्यात आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये 21 हजार  कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर गेली आहे. सध्या सुरू असलेल्या संघर्षांदरम्यान जगभरातील संरक्षण परिसंस्थेमध्ये तंत्रज्ञानाच्या वाढत्या भूमिकेवर सिंह यांनी प्रकाश टाकला. ड्रोन, लेझर युद्ध, सायबर युद्ध, अचूक मार्गदर्शित क्षेपणास्त्रे आणि हायपर-सॉनिक क्षेपणास्त्रांच्या वापरामुळे  युद्ध तंत्रज्ञानाभिमुख बनलं आहे. संरक्षण स्वावलंबनामध्ये सरकारच्या पूर्ण पाठिंब्याची ग्वाही देत याकामी खाजगी क्षेत्र आणि शैक्षणिक संस्थांसह सर्व संबंधितांना सोबत घेण्याच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला.

**सौर दुर्बीण**

सूर्यावर लक्ष ठेवण्यासाठी भारत लद्दाखमध्ये नॅशनल लार्ज सोलर टेलिस्कोप – एनएलएसटी उभारण्याची तयारी करत आहे. या प्रकल्पाचं  नेतृत्व बंगळुरूच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्स - आयआयए चे संचालक प्राध्यापक अन्नपूर्णी सुब्रमण्यमकरत आहेत. या प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यात आली असून हा प्रकल्प अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. आयआयए नुसार, या दुर्बिणीमध्ये 2 मीटरचे रिफ्लेक्टर बसवलेले असतील. यामुळे शास्त्रज्ञांना सूर्यावर होत असलेल्या हालचाली समजून घेण्यास आणि संशोधन करण्यास मदत होईल.

**क्रिकेट**

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी काल भारतीय गोलंदाजांनी न्यूझीलंडला दुसऱ्या डावात 9 गडी बाद करत 171 धावांवर रोखलं. त्यामुळे विजयाचं पारडं आता भारताकडे झुकलं आहे. 28 धावांची आघाडी गमावल्यानंतर न्यूझीलंडकडे आता 143 धावांची आघाडी आहे. न्यूझीलंडच्या विल यंगने अर्धशतक झळकावलं. भारताकडून रवींद्र जडेजाने 4, तर रविचंद्रन अश्विनने 3 बळी घेतले. वॉशिंग्टन सुंदर आणि आकाश दीपने प्रत्येकी 1 बळी घेतला. तत्पूर्वी, शुभमन गिल आणि ऋषभ पंतच्या 60 धावांच्या बळावर भारताने सर्व गडी बाद 263 धावा केल्या होत्या.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**